**श्री. अशोक अंबादास पंडीत,वरिष्ठ सहाय्यक (लेखा) आरोग्य विभाग,जि.प.अहिल्यानगर यांनी कार्यालयीन कामी गैरवर्तन केलेने विभागीय चौकशी सुरु करणेकामी सादरकर्ता व चौकशी अधिकारी यांची नेमणुक करणेबाबत.**

अहिल्यानगर जिल्हा परिषद
अर्थ विभाग
आदेश क्रमांक अर्थ/कार्या-१/आस्था-१/३९८/२०२५
अहिल्यानगर दिनांक १९/०९/२०२५

वाचाः-१.मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद अहिल्यानगर यांचेकडील आदेश जा.क्र.अर्थ/कार्या-१/आस्था-१/४१९/२०२४ दिनांक ०३/१२/२०२४

२.चौकशी समिती अहवाल जा.क्र.अहिल्यानगर/चौकशी/१८/२०२४ दिनांक ०३/०१/२०२५

३. इकडील ज्ञापन/दोषारोप पत्र क्रमांक अर्थ/कार्या-१/आस्था-१/२२९/२०२५ दिनांक ०५/०७/२०२५

४. गट विकास अधिकारी, पंचायत समिती शेवगाव यांचेकडील पत्र क्रमांक वशि/अस्था-१/४५६/२०२५ दिनांक १५/०७/२०२५ अन्वये ज्ञापन/दोषारोप पत्राची सादर केलेली पोहच.

५. गट विकास अधिकारी, पंचायत समिती शेवगाव यांचेकडील पत्र क्रमांक वशि/अस्था-१/५४८/२०२५ दिनांक ०४/०८/२०२५

६. महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील ६ (३) व (५) नुसार

श्री.अशोक अंबादास पंडीत, वरिष्ठ सहाय्यक (लेखा) आरोग्य विभाग,जि.प.अहिल्यानगर हे सार्वजनिक बांधकाम उत्तरविभाग जिल्हा परिषद अहिल्यानगर येथे तत्कालीन वेळी कनिष्ठ सहाय्यक (लेखा) या पदावर कार्यरत असताना व तदनंतर आरोग्य विभाग,जि.प.अहिल्यानगर येथे वरिष्ठ सहाय्यक (लेखा) या पदावर कार्यरत असताना संशयीत अपहार प्रकरणी संदर्भ क्रमांक १ अन्वये चौकशी समिती नियुक्त करुन जि.प.सा.बां.उत्तरविभाग,अहिल्यानगर येथील लेखाविषयक व अन्य दप्तर तपासणीचे आदेश निर्गमित करण्यात आलेले होते. व त्याप्रमाणे संबधित गठीत समितीने प्रस्तुत चौकशी संदर्भ क्रमांक २ अन्वये कार्यालयास सादर केलेला आहे.त्याप्रमाणे श्री.पंडीत,वरिष्ठ सहाय्यक (लेखा) यांनी कार्यभार हस्तांतरीत न करणे,शासकीय दस्तऐवज अनधिकृत रित्या स्वतःजवळ बाळगणे,कपांतीच्या रकमा स्वतःच्या पॅन क्रमांकावर जमा करणे,शासकीय रकमेच्या कपातीचे धनाकर्ष ची रक्कम स्वतः च्या खातेमध्ये जमा करणे,न वटविलेल्या कपातीचे धनाकर्ष स्वतःजवळ ठेवणे तसेच खोटे दस्तऐवज तयार करुन खोटया स्वाक्ष-या करुन स्वतःच्या खात्यावर रकमा जमा करणे इ.प्रकारचे गैरवर्तन केल्याचे निर्दशनास आलेले आहे.

त्याप्रमाणे संदर्भ क्र.३ अन्वयेचे ज्ञापन दोषारोप श्री.पंडीत यांना संदर्भ क्र. ४ अन्वये दिनांक ११/०७/२०२५ रोजी बजाविण्यात आलेले आहे.व श्री.पंडीत यांना सदर दोषारोप पत्र प्राप्त झालेपासून १० दिवसांचे आत बचावाचे निवेदन सादर करणेबाबत फर्माविण्यात आलेले होते.

तथापी संदर्भ क्रमांक ५ अन्वये प्राप्त पत्रानुसार श्री.पंडीत यांनी त्यांचे बचावाचे निवेदन विहीत मुदत संपुनही अदयाप प्राप्त नसलेचे कळविलेले आहे.

त्यानुसार श्री.पंडीत यांनी बचावाचे निवेदन सादर न केलेचे दिसुन येत असल्याने श्री. अशोक अंबादास पंडीत, वरिष्ठ सहाय्यक (लेखा), आरोग्य विभाग,जि.प.अहिल्यानगर यांचेविरुध्द न्याय हक्काचे दृष्टीने विभागीय चौकशी करणे आवश्यक असलेने महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ६ (३) व (५) च्या तरतुदीनुसार खातेनिहाय विभागीय चौकशी करणेचे निश्चित करण्यात आलेले आहे.

त्यासाठी सदरची चौकशी करणेकामी चौकशी अधिकारी, तथा सहाय्यक आयुक्त,विभागीय चौकशी (जि.प.कर्मचारी),आयुक्त कार्यालय,नाशिक विभाग, नाशिक यांची नियुक्ती करणेत येत आहे. विभागीय चौकशीस महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ च्या नियमातील तरतुदी लागु राहतील.

महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ चे नियम ६ (५) अन्वये जिल्हा परिषदेची बाजु मांडणेकरिता सादरकर्ता अधिकारी म्हणुन **श्री. जरे संभाजी अण्णासाहेब, कनिष्ठ प्रशासन अधिकारी, सार्वजनिक बांधकाम उत्तरविभाग, जिल्हा परिषद अहिल्यानगर** यांची नेमणुक करण्यात येत आहे. सादरकर्ता अधिकारी यांनी प्रत्येक चौकशीचे तारखेस हजर रहावे.त्याप्रमाणे संदर्भ क्र.२ मध्ये नमुद केलेले आक्षेप व पुरावे यांचा सखोल अभ्यास करुन जिल्हा परिषदेची बाजु मांडावी. परिशिष्ट क्र.तीन व चार मध्ये (दोषारोपपत्र) नमुद केलेले साक्षीदार यांना पुराव्याच्या कागदपत्रांसह चौकशीच्या दिवशी हजर ठेवावे. तसेच सोबत आवश्यक कागदपत्रांचा तपशिल जोडला आहे. उक्त नमुद कामी हयगय झाल्यास सादरकर्ता अधिकारी यांना जबाबदार धरण्यात येईल.

सदर आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेतांक क्रमांक २०२५ ०९१९०५००५४ असा आहे.

Signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 19-09-2025 09:52:43

**(आनंद भंडारी)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद अहिल्यानगर**

**प्रति,**

१. प्रतः-विभागीय चौकशी अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,विभागीय चौकशी (जि.प. कर्मचारी), नाशिक विभाग,नाशिक.सोबत संबंधीत प्रकरणाचे आवश्यक कागदपत्र १ ते १२५.

२. श्री.जरे संभाजी अण्णासाहेब, कनिष्ठ प्रशासन अधिकारी,सार्वजनिक बांधकाम उत्तरविभाग, जिल्हा परिषद अहिल्यानगर

३. व्दारा व प्रत- कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम उत्तरविभाग, जिल्हा परिषद अहिल्यानगर

२/-सदर आदेशाची प्रत श्री.जरे संभाजी अण्णासाहेब, कनिष्ठ प्रशासन अधिकारी,यांना बजावुन दिनांकित स्वाक्षरीची प्रत या कार्यालयास सादर करावी.सोबत संबंधीत प्रकरणाचे आवश्यक कागदपत्र पान क्र.१ ते १२५.

४. श्री. पंडीत अशोक अंबादास, वरिष्ठ सहाय्यक (लेखा), आरोग्य विभाग,जि.प.अहिल्यानगर
व्दारा :- गट विकास अधिकारी,पंचायत समिती शेवगाव

२/-सदर आदेशाची प्रत अशोक अंबादास पंडीत, वरिष्ठ सहाय्यक (लेखा) यांना बजावुन दिनांकित स्वाक्षरीची प्रत या कार्यालयास सादर करावी.